| | |
|---|---|
| **MHPU080011702009** | **R.C.C./700039/2009**<br>**State of Maharashtra Vs. Hemant Devidas Sharma** |

<u>**निशाणी क्रमांक १ वरील आदेश**</u>

सदरचा खटला आरोपींविरुध्द मुंबई पोलिस कलमाचे ३७(१) सह कलम १३५ व आर्म ॲक्ट कलम ४ (२५) अन्वये सन २००९ मध्ये दाखल करण्यात आलेला आहे. खटला न्यायालयात दाखल केल्यापासून आरोपी सतत न्यायालयात गैरहजर राहिले. आरोपींविरुध्द सतत अजामीनपात्र वॉरंट काढून देखील आरोपींची हजेरी खटल्यामध्ये येवू शकलेली नाही. सदर खटल्यातील अभियोगपक्षाने आरोपींना न्यायालयात उपस्थित करण्याकरीता कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत. सबब, माझे पुर्वपिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ८२ प्रोक्लमेशन तसेच कलम ८३ अंतर्गत जप्ती वॉरंटचा आदेश पारित केलेला आहे. प्रोक्लमेशन तसेच जप्ती वॉरंट काढून देखील आरोपींची हजेरी खटल्यामध्ये येवू शकली नाही. खटल्यामध्ये कोणतेही साक्षीदार न्यायालयासमक्ष साक्ष देण्यास हजर झाले नाहीत.

२. येथे नमूद करणे गरजेचे आहे की, सन २००९ पासून आरोपींना न्यायालयात हजर ठेवण्यास अभियोगपक्ष अपयशी ठरल्याने तसेच आरोपींविरुध्द साक्ष देण्याकरीता साक्षीदारांची उपस्थिती न्यायालयात ठेवण्यास अभियोगपक्ष सपशेल अपयशी ठरलेला आहे. त्यामुळे, आरोपींविरुध्द दाखल करण्यात आलेले दोषारोप निराधार आहे असे माझे मत झालेले आहे. त्यामुळे, आरोपींना दोषमुक्त करणे क्रमप्राप्त आहे. सबब, मी खालील आदेश

करीत आहे.

**:: <u>आदेश</u> ::**

१. **आरोपी हेमंत देविदास शर्मा** यांस फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २३९ अन्वये मुंबई पोलिस कलमाचे ३७(१) सह कलम १३५ व आर्म अॅक्ट कलम ४ (२५) मधुन दोषमुक्त करण्यात येत आहे.

२. खटल्यात जप्त केलेली एक स्टीलची तलवार मुल्यहीन असल्याने अपिल कालावधीनंतर जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे पाठविण्यात यावी.

३. येणेप्रमाणे खटल्यातील दस्तऐवज नसतीबंद करण्यात यावे.

LALIT VASANTRAO SHRIKHANDE
Digitally signed by LALIT VASANTRAO SHRIKHANDE
Date: 2026.08.19 17:21:30 +0530

(एल. व्ही. श्रीखंडे )

दिनांक - १९/०८/२०२६

प्र. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.३, खडकी, पुणे.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. S. Waykar (Grade- III) |
| Name of the Court | : | Shri. L. V. Shrikhande,<br>J.M.F.C. Court No. 3, Khadki,<br>Pune |
| Date | : | 19.08.2026 |
| Order signed by the Presiding officer on | : | 19.08.2026 |
| Order uploaded on | : | 19.08.2026 |